# प्रथा - काही उपआख्याने

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

*(प्रत्येक 'तो' वेगळा आहे.)*

- तो मूळचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा. विद्यार्थीदशेनंतर संघाशी फारसा संबंध राहिला नाही. त्याच्याबरोबरचे बहुतेक जण जगण्याचा हिसका बसू लागला की नोकरी, लग्न, कुटुंब, मुले या चक्रात अडकत. त्यांचा उत्तरायुष्यात संघाशी सक्रिय संबंध राहात नाही. अगदी क्वचित एखादा वर्षाकाठी रजा काढून महिन्याभरासाठी वनवासी कल्याण आश्रमाला जाईल.

कॉलेजमध्ये कट्टर कम्युनिस्ट असणारेही असेच मुख्य प्रवाहात यथावकाश विरघळून जातात.

तरुण वयात एखाद्या आदर्शवादाचा बिल्ला हिरिरीने लावणाऱ्यांचा बिल्ला यथावकाश केव्हा हरवतो, त्यांचे त्यांनाच कळत नाही.

या प्रथेप्रमाणे तो वागला.

काही विवाद्य संस्कार मात्र कायम रहातात आणि ते आयुष्यभरासाठी घट्ट पूर्वग्रह होतात.

उदाहरणार्थ, संघाच्या समजुतीचे हिंदू धर्माचे आणि मुस्लिम धर्माचे आकलन. किंवा कम्युनिस्ट मंडळींसाठी भांडवलदार-सरकार हातमिळवणी असते आणि ते नाही-रे वर्गाचे शोषण करतात. असे मुद्दे या लोकांसाठी चारचौघात गप्पा मारण्यापुरते रहातात.

तो फारसा शिकला नाही. शालान्त परीक्षाही पार झाला नाही. कुस्तीत त्याला रस होता पण तो छंद काही पुढे सरकला नाही. वडिलांनी एका दुसऱ्या गावच्या साखर कारखान्यात नोकरी लावून दिली. तिथे तो टिकला. पगार फारसा नसे. यथावकाश मूळ गावातल्याच एक मुलीशी लग्न झाले. आयोजित लग्न, प्रेमविवाह नव्हे. यथावकाश चार मुले झाली. पहिला मुलगा, मग दोन मुली, मग आणखी एक मुलगा.

पहिल्या मुलाला कॉलेजमध्ये शिकायला थोरल्या भावाकडे पुण्यात ठेवला. तो पदवीधर झाला आणि दुसऱ्या एका भावाच्या वशिल्याने एका मोठ्या कारखान्यात नोकरी करू लागला. वयानुसार प्रथेप्रमाणे त्याला स्त्रियांबद्दल आकर्षण वाटू लागले. प्रथम एका दिसायला बऱ्या मावसबहिणीबद्दल. प्रथेप्रमाणे तिच्याबाबत रोमँटिक विचार तो सतत करत असे. अखेर नुसत्या आपल्या पतंग उडवण्याने प्रकरण सुरूही होणार नाही हे लक्षात येऊन त्याने आईला तिच्याशी लग्न करण्याबाबत मध्यस्थी करायची विनंती केली. आईला काही ती मुलगी सून म्हणून पसंत नव्हती; पण पुत्रप्रेमाने प्रथेप्रमाणे तिने स्वतःच्या मताला मुरड घातली. बहिणीकडे या प्रस्तावाची चाचपणी केली. बहिणीने एक क्षणही न घालवता प्रस्ताव धुडकावून लावला. 'तू नहीं और सही, और नहीं और सही' या न्यायाने त्याने आता आपल्याला मामेबहीण आवडते असे ठरवले. प्रथेप्रमाणे तिच्याबाबत रोमँटिक विचार तो सतत करत असे. अखेर नुसत्या आपल्या पतंग उडवण्याने प्रकरण सुरूही होणार नाही हे लक्षात येऊन त्याने आईला तिच्याशी लग्न करण्याबाबत मध्यस्थी करायला विनंती केली. आईला काही ती मुलगी सून म्हणून पसंत नव्हती पण पुत्रप्रेमाने प्रथेप्रमाणे तिने स्वतःच्या मताला मुरड घातली. भावाकडे या प्रस्तावाची चाचपणी केली. भावाने मुलीला विचारतो असे म्हटले. त्याने मुलीला विचारल्यावर तिने नकार दिला. असा एकतर्फी प्रेमात दोन वेळा पराभव झाल्यावर त्याने प्रथेप्रमाणे आपल्या लग्नाचा निर्णय आई-वडिलांवर

सोडला. त्यांनी ग्रामीण भागातील एक मुलगी शोधली. देण्याघेण्याच्या वाटाघाटी समाधानकारक झाल्यावर यथावकाश लग्न झाले, यथावकाश एक मुलगीही झाली. दोघेही एकमेकांना आवडू लागले. असा त्यांचा संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले.

पण प्रथेप्रमाणे आयुष्य इतक्या सरळ रेषेत राहिले नाही.

त्याची पहिली नोकरी एका मोठ्या चांगल्या कंपनीत होती. अनेक वर्षे तिथे काढून त्याने नोकरी बदलली. दुसऱ्या लहान कंपनीत नवी नोकरी घेतली. तेथे जेमतेम एक वर्ष झाले असेल, तो आजारी पडू लागला. तपासण्यात त्याला क्षय झाल्याचे निदान झाले. ती दीर्घ आणि महागडी ट्रीटमेंट सुरू झाली. दरम्यान कंपनी बंद पडली आणि नोकरीवर गदा आली. सुदैवाने भारतात विरळा अशी गोष्ट म्हणजे ओळखीचा डॉक्टर चांगला निघाला. त्यामुळे जितके पैसे वाचू शकतील तितके वाचले व तो बराही झाला. पैशाची ओढाताण चालू राहिली.
पुढचा धक्का म्हणजे बायकोला कॅन्सर झाला. दुसरी दीर्घकालीन खर्चिक ट्रीटमेंट. पैशाची ओढाताण वाढली. मदतीसाठी त्याची एक काकू काही काळासाठी तेथे येऊन राहिली. असे रुग्ण जेवढे बरे होऊ शकतात तेवढी बायको बरीही झाली.
दरम्यान मुलीला फोटोग्राफीत इंटरेस्ट निर्माण झाला. तो महागडा छंद आई-वडिलांनी परवडत नसतानाही जोपासला. पैशाची ओढाताण आणखी वाढली.
सुदैवाने मुलगी पुढे यशस्वी व्यावसायिक फोटोग्राफर झाली आणि जगभर त्या कामासाठी हिंडू लागली.

परत मूळ कुटुंबाकडे वळता, त्याच्यानंतरची मुलगी तिच्या तिसऱ्या काकाकडे राहिली, नीट शिकली. आई-वडिलांनी एक चांगला मुलगा शोधून तिचे लग्न लावून दिले. ते लग्न नीट जमले. लवकरच ती 'गुनगुना रहे हैं भंवरे..' अशी गाणी म्हणू लागली. तिचा आवाज तिच्या आईच्या आवाजासारखाच चांगला होता. ती कौटुंबिक कार्यक्रमात भक्तिगीते, लग्नात मंगलाष्टके म्हणत असे. तिची मुलगी हुशार निघाली. कॉम्प्युटर सायन्समध्ये ती विद्यापीठात पहिली आली. कुटुंबाला अर्थातच ही अभिमानाची गोष्ट झाली.

यथावकाश साखर कामगार निवृत्त झाला. कारखान्याचे गाव तर सोडायचे, मग राहाणार कोठे हा प्रश्न आला. वडिलांचा मूळ गावी मोठा वाडा होता, त्यात भाडेकरू होते पण काही भाग स्वतंत्र होता. तेथे तो बायकोबरोबर राहायला गेला. यथावकाश इतर भावांनी वाड्यावरचा त्यांचा हक्क सोडला आणि वाडा त्याच्या नावचा झाला.

तिसरे अपत्य एक मुलगी. तिचे आयुष्य अवघड गेले. ती आधी तिच्या थोरल्या भावाकडे मुंबईजवळ राहात असे. तिथे आनंदात होती. ती स्वतंत्र मानसिकतेची होती. पण लग्नाची वेळ आली. पहिले लग्न प्रथेप्रमाणे बँकेत काम करणारा मुलगा, बरे कुटुंब पाहून आई-वडिलांनी दुसऱ्या शहरात जुळवले. ती गृहिणी राहाणार, म्हणजे, बाहेर नोकरी करणार नाही हे गृहीत होते. प्रथेप्रमाणे ती आता गर्भार राहाणे अपेक्षित होते. तसे होईना म्हणून थोरल्या बहिणीने चौकशी केली. त्यात तिच्या नवऱ्याला ती शारीरिक क्षमता नाही हे कळून आले.
तेव्हा तो कधी सहज भेटायला गेले तर बाहेरच का असतो, बँक बंद झाली तरी तासन् तास घरी का येत नाही याचा उलगडा होऊ लागला. त्यात त्याने त्याच्या चुलतभावाबद्दलच्या असूयेने त्याच्यासारखाच धंदा चालू केला. इंटिरियर डेकोरेशन करणे हा तो धंदा. या धंद्याचा प्रयत्न बरेच मध्यमवर्गीय तरुण करतात. मुळात याला प्राथमिक इंजिनीअरिंग माहिती नव्हते. ना त्याने त्याबाबत कोणाचा सल्ला घेतला. त्यामुळे पहिल्या काही ओळखीच्या लोकांनी दिलेले काम समाधानकारक झाले नाही. त्यांच्या तक्रारी येऊ लागल्या. धंदा चालेना. कंत्राटदार, कामकरी सुतार पैशासाठी दारात येऊ लागले. निवृत्त वडिलांना ही डोकेदुखी झाली. त्यांनी स्वतःचे पैसे देऊन त्या लोकांची बोळवण केली. हा उपक्रम बंद पडला.

दरम्यान त्याची नपुंसकता ही कौटुंबिक समस्या झाली.

तिच्या आईने नवस, पूजा असे मार्ग अवलंबले. वडिलांनी सरळ वैद्यकीय सल्ला घेतला. काही उपचार सुरूही झाले पण हा नंतरच्या डॉक्टरच्या अपॉइंटमेंट्सला जात नसे. परिस्थितीत फरक पडेना. मग त्याने 'आता मी संन्यास घेऊन हिमालयात जातो' अशी भाषा सुरू केली. अखेर त्याच्या घरून मिळालेले दागिने सासूच्या पायावर ठेवून, तिला नमस्कार करून मुलगी माहेरी आली.

मग प्रथेप्रमाणे तिच्या दुसऱ्या लग्नासाठी प्रयत्न सुरू झाले. दुसऱ्या शहरातील एक घटस्फोटित तरुण सापडला. त्याचे वडील एका स्थानिक दैनिकाचे संपादक होते. त्यांचे नाव चांगले होते. त्यांना केंद्रीय सरकारी पुरस्कारही मिळत होते. त्याच्या अनेक बहिणी विवाहित आणि सुस्थळी होत्या. पैसा, प्रतिष्ठा या दृष्टीने हे स्थळ मुलीच्या कुटुंबाच्या बरेच वरचे होते. प्रॉब्लेम म्हणजे हा इसम अमली पदार्थांचा व्यसनी होता. ही गोष्ट प्रथेप्रमाणे मुलीच्या कुटुंबीयांपासून लपवून ठेवण्यात आली. त्याच्या आई-वडिलांना दुसऱ्या लग्नानंतर तो ताळ्यावर येईल अशी प्रथेप्रमाणे भाबडी अपेक्षा होती. तसे झाले नाही.

जेव्हा नशेत नसेल तेव्हा तो सतत तंबाखू चघळत असे. एकदा एका लग्नाच्या जेवणात समोर जेवणाचे ताट आल्यावर त्याने तोंडातील तंबाखूची गोळी बाहेर काढून ताटाच्या बाजूला ठेवली आणि खाणे सुरू केले. खाणे संपल्यावर ती गोळी परत लावली. आपण चारचौघांत आहोत तर किमान औपचारिकता पाळायला पाहिजे, याचे भान त्याला नसे. हीही समांतर प्रथाच. बऱ्याच जणांना हे भान नसते.

वैवाहिक जीवनाचे मातेरे लक्षात घेता, आता पुनर्विवाहानंतर मुलीला फक्त एक मूल हवे होते. सुदैवाने तिची ती इच्छा पूर्ण झाली आणि एक निरोगी मूल जन्माला आले. सासूबरोबर तिने एक व्यवसायही सुरू केला. सासऱ्यांच्या गावातील ओळखी चांगल्या होत्या. या ओळखीच्या लोकांच्या घरगुती समारंभासाठी जेवण तयार करणे तिने सुरू केले. तो व्यवसाय चांगला चालत होता. पण त्यात तिच्या सासऱ्यांना घशाचा कॅन्सर झाला आणि स्वरेंद्रिय काढावे लागले. हा तिला मोठा धक्का होता कारण सासरे तिला मोठा आधार होता.

दुसरा मोठा आधार अर्थातच मुलगा होता. तो सरळ शिकत होता. पोहण्यातही प्रवीण होता.

दुर्दैवाने तिला मधुमेहाचा विकार जडला. हा विकार बळावला. पुरेशी वैद्यकीय खबरदारी घेतली गेली नसेल किंवा संसाराचे अपयश असेल, मधुमेह विकोपाला गेला. तिचा एक पाय घोट्यापासून तोडावा लागला. जयपूर फूट बसवायला लागला. तरी ती उमेद बाळगून होती. 'आता बाळ चालायला शिकलं' असे स्वतःबद्दल म्हणत असे. पण लवकरच मृत्यूने घाला घातला.

दरम्यान गावाकडे असणाऱ्या आई-वडिलांची स्वतःची दुःखे अधिक बिकट होत होती. तिच्या वडिलांच्या पायांतील शक्तीच अचानक गेली. त्यांना अंथरुणावरून हलता येईना. गावात शक्य ते उपचार केले, अखेर एक फिरस्ता वैदू त्या गावात आला. त्याने मालीश करून त्यांच्या पायात पूर्वीइतकी नाही पण बऱ्यापैकी ताकद आणली. पण धाकटा मुलगा व्यसनाधीनतेने अकाली गेला. त्याचे लग्न झालेले होते आणि एक मुलगाही होता. त्या मृत्यूचा आईच्या मनावर परिणाम झाला आणि तिचे विस्मरण, असंबद्ध बोलणे, लोकांना न ओळखणे वाढू लागले. मुलगा गेला असूनही ती जेवणाच्या वेळेला त्याला 'जेवण तयार आहे, जेवायला ये' अशा हाका मारत असे. मदतीसाठी थोरली मुलगी काही काळ तेथे राहायला आली. ही परिस्थिती लक्षात घेऊन मुलगी गेल्याचे वडिलांच्या कानावर कुटुंबातील इतरांनी घातले नाही.

खरे हाल झाले ते त्यांच्या सुनेचे. आधी व्यसनाधीन नवरा, आता अपंग सासू-सासरे, एक शालेय मूल अशी तिची कोंडी होती. यथावकाश आई मरण पावली. मग सासऱ्याला सांभाळणे सुनेवर पडले. तिने कर्तव्य म्हणून त्याला जपले. यथावकाश त्याने जगाचा निरोप घेतला.

- ते चार्टर्ड अकाउंटंट होते. आधी आफ्रिकेत बरीच वर्षे नंतर अमेरिकेत. त्यांचे लग्न त्यांना पसंत नसलेल्या

मुलीशी आई-वडिलांनी प्रथेप्रमाणे जमवले. ते किल्मिष आयुष्यभर प्रथेप्रमाणे त्यांनी जपले. त्यात बायको बुद्धीने त्यांच्यापेक्षा कमी असल्याने प्रथेप्रमाणे त्यांची घुसमट होत असे. एक मुलगा झाला तर जरा मोकळीक येईल, त्याला आपण आपल्या कल्पनेनुसार वाढवू अशी त्यांची सुरुवातीला प्रथेप्रमाणे इच्छा होती. पण त्यांना एकामागून एक पाच मुली झाल्या. मुलगा नाही तर एखाद्या मुलीला आपल्या कल्पनेनुसार वाढवू हा विचारही त्यांना सुचला नाही. कारण प्रथा. लग्नात मजा नव्हतीच. निवृत्तीनंतर त्यांनी भारतात यायचे ठरवले. बायको व तीन मुली अमेरिकेतच राहिल्या. दोन मुली पुण्याला शिकायला होत्या त्या पुण्यातच राहिल्या. तेही पुण्यात आले. अमेरिकेतील नोकरीचे पुरेसे पेन्शन त्यांना पुण्यात मिळत असे. त्यांचा फ्लॅटही चांगल्या एरियात होता.

दोन्ही मुलींनी स्वतःची लग्ने स्वतः ठरवली. त्यातली थोरली मुलगी वकील झाली. वकिली ज्ञानाचा पहिला प्रयोग तिने वडिलांवर केला. त्यांचा फ्लॅट आपल्या नावावर करून घेतला. ते बेघर झाले. दुसऱ्या मुलीच्या सासरच्या इमारतीतील तिच्या एका गॅरेजमध्ये ते राहू लागले. पेन्शन हातात आले की पंधरा दिवस ते रोज बेसुमार दारू पीत असत. प्रसंगी झिंगून रस्त्यावर पडत. आपल्या आयुष्यात जे काही घडले व जे काही घडले नाही या फिलिप रॉथच्या उद्धरणानुसार त्यांनी एक विचारवर्तुळ आखले होते. ते उद्धरण वारंवार ठसवण्यासाठी ते दारूला सामोरे जात. पैसे हाताशी असतच. या पंधरा दिवसांत जेवणाखाण्याकडे त्यांचे लक्ष नसे. पैसे संपत आले की उरलेले पंधरा दिवस सात्त्विक जात. तेव्हा हे असेच चालायचे हा स्थैर्य देणारा विचार असे. हा दर महिन्याचा कार्यक्रम.

तेवढ्यात धाकट्या मुलीच्या मुलाला शिकायला परदेशी जायचे होते म्हणून गॅरेज विकायचे होते. तिने दयामाया न करता यांना तेथून बाहेर काढले. ते भाड्याने जवळच्या दुसऱ्या गॅरेजमध्ये रवाना झाले.

धाकट्या मुलीला मध्यंतरी दारूचे व्यसन लागले. हा वडिलांचा वारसा. मिळकत स्वतःची होती, नवरा काहीतरी उद्योगात असे. पण वादविवाद, फालतू भांडणे याखेरीज त्यांचे संवाद नसत. दोन्ही मुले व्यवस्थित शिकत होती. त्यामुळे नोकरीचे तास सोडल्यावर तिला उरलेला वेळ कठीण होत असे. प्रथेनुसारचे छंद म्हणजे पौर्वात्य किंवा पाश्चात्त्य अभिजात किंवा आधुनिक संगीत ऐकणे, सोशल मीडिया, नृत्य, चित्रकला, फोटोग्राफी, सिनेमे, पक्षीनिरीक्षण, पुस्तके, नाटके, शिल्पकला, पतंग उडवणे, दुर्बिणीतून रात्रीचे आकाश न्याहाळणे, ज्युडो, तायकोंदो, कराटे, जिजीत्सु, ओरिगामी, घोडेस्वारी, नवीन पाककृती करणे, बागकाम, जिमला जाणे, योग, रोजच्या बातम्यांचे पेपरमध्ये वाचन नाही तरी त्या टीव्हीवर बघणे, गल्लीतल्या बायकांबरोबर कबड्डी, लंगडी, फुगड्या, झिम्मा, आट्यापाट्या, डबडा ऐसपैस, नाच ग घुमा कशी मी नाचू, घागरी फुंकणे, दोरीच्या उड्या, गोट्या, लपंडाव, शिवाशिवी, टिपऱ्या, लगोरी, पत्ते खेळणे, गाण्यांच्या भेंड्या लावणे यातले काहीही तिला आवडत नसे. त्यातल्या एकाचाही तिने कधीच प्रयत्न केला नाही.

त्या काळात तिला काल्पनिक गोष्टी खऱ्या मानायची सवय लागली. एखादी वर्तमान किंवा भूतकाळातील इच्छा असली तर ती पूर्ण झाल्यात ती जमा धरत असे. उदाहरणार्थ, आपले वडील पाचही मुलींना घेऊन कसे रोज जवळच्या टेकडीवर फिरायला जायचे अशी एक पूर्ण कपोलकल्पित कथा ती सांगत असे. अशा खोट्या गोष्टींना जोडून तिने वास्तवाशी फारकत घेतली होती. म्हणजे आपण एखाद्याला शब्द दिला तर तो पाळणे ही किमान नैतिकता तिला माहीत नव्हती. ती सहजपणे अवाच्या सवा शब्द देत असे. जर त्या माणसाचे ते काम झाले नाही तर ती दिलेला शब्द तितक्याच सहजपणे फेकून देई.

नात्यातील एकाला त्यांच्या एरियामध्ये एकदा एक फ्लॅट माहिन्याभरासाठी भाड्याने हवा होता. 'परवाच्या दिवशी हे काम होईल' असे तिने प्रचंड आत्मविश्वासाने सांगितले. काम झाले नाही. तेही तिने तितक्याच बेपर्वाईने डोक्यातून काढून टाकले. फ्लॅट हवा असणारा अधांतरीच!

त्यात नवऱ्याने एका विवाहितेबरोबर खरोखरच प्रेमप्रकरण सुरू केले. मग हिची जरा पंचाईत झाली. वडील निम्मा

महिना धुंदीत असत. आईचे फारसे प्रेम नव्हते. पुण्यात एकच बहीण, बाकी अमेरिकेला. त्याही काही फारशा जवळच्या नव्हत्या. पहिल्यापासून मैत्रिणी नव्हत्या. मग दारू उपयोगी झाली. एखादा दिवस दारू नसली की तिला शारीरिक त्रास होत असे. त्यामुळे मानसिकही. असा दिवस येऊ नये याबाबत ती काळजी घेत असे. तरी, एकदा वेगळ्या कोणत्यातरी आजारावर डॉक्टरांनी जी औषधे दिली, त्यातल्या महत्त्वाच्या एका औषधाला दारू वर्ज्य होती. आता प्रॉब्लेम आला. दोन दिवसांनी तिला दारू नसल्याने गंभीर withdrawal होऊ लागली. नवऱ्याने तडफडत हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यांनी दोन दिवस ट्रीटमेंट करून 'आता दारू बंद' असे सांगून सोडले. या दरम्यान ती मेली असती तर बरे असे नवऱ्याला वाटले. पण काही वर्षांनी तिचे आणखी एक मोठे दुखणे निस्तरणे त्याच्या नशिबी होते.

दोन्ही बहिणींचे चांगले सख्य होते, दोघींच्या मुली सारख्याच वयाच्या होत्या. दोघींनाही पैसा हे सर्वस्व होते. आई-बाप, अगदी मुलेही दुय्यम. धाकटी तर स्वतःला कोणत्याही कामातून किती पैसा सुटेल एवढाच विचार सतत करत असे. इतक्या एकमितीत संपूर्ण आयुष्य ही एक प्रथाच.

हल्ली बँकेतून एका अकाउंटमधून पैसे तत्काल दुसऱ्याला देता येतात. धाकटीवर उपकार म्हणून तिच्या मुलाच्या शिक्षणासाठी अधूनमधून एक जण पैसे देत असे. तिने मागितल्यावर लगेच तो ते त्याच्या अकाऊंटमधून पाठवे. सामान्यतः दहा मिनिटांत पैसे ट्रान्सफर होतात. तिला तेवढाही दम नसे. त्याने पैसे पाठवले असे कळवल्यावर त्या क्षणापासून 'पैसे अजून आले नाहीत' असा पाठपुरावा ती ओळीने करत असे. फोन ठेवला की पुढचा फोन. 'माझ्या अकाऊंटमधून पैसे गेले आहेत, आता मी काही करू शकत नाही' असे तो वैतागून प्रत्येक वेळी सांगे आणि डोक्यावर हात मारून घेई. हे नेहमीचेच असले तरी त्याला त्याची सवय होत नसे. हा त्याचा प्रॉब्लेम होता. कुत्र्याच्या शेपटासारखी तिची आदतही बदलत नसे. हा तिचा प्रॉब्लेम नव्हता.

दोघी बहिणींना टॅरो कार्डावरून भविष्य बघण्यात फार इंटरेस्ट होता. धाकटी तर जेव्हा असेल तेव्हा संध्याकाळी टीव्हीवर तसा चॅनेल बघत असे. वकील मुलीचा नवरा काहीतरी उद्योग करत असे. त्यात त्याला भराभर भरपूर पैसे मिळू लागले. वडिलांकडून हडपलेला फ्लॅट विकून त्यांनी नवा फ्लॅट घेतला. अल्पावधीत श्रीमंत झालेल्या भारतीयांच्या प्रथेनुसार त्यांनी फ्लॅटचे इंटिरियर डेकोरशन महागडे व एखाद्या गुत्त्यासारखे बटबटीत करून घेतले. यथावकाश त्यांनी एक, दोन, तीन गाड्याही घेतल्या. प्रथेप्रमाणे स्वतःचा यात काहीही सहभाग नसला तरी या वैभवाचा तिला गर्व होता.

प्रथेप्रमाणे आपल्याहून गरीब लोकांना ती तुच्छतेने वागवत असे.

मध्यंतरी तिच्या नवऱ्याला प्रथेप्रमाणे हार्ट प्रॉब्लेम आला. यथावकाश अशी माणसे होऊ शकतात तेवढा तो बरा झाला.

अशा रूटीनमध्ये आता मुलीचे लग्न करायचे एवढाच काय तो प्रश्न राहिला. भारतातील विविध राज्यांच्या निवडणुका, ब्रिटनमधील, अमेरिकेतील सत्तापालट वगैरे बृहत्समाजातील घटनांची माहितीही वकिलिणीला कधीच नव्हती. अशी जाणीव होणे तिच्या प्रथेबाहेरचे होते.

दरम्यान धाकट्या मुलीचे हृदयाचे ऑपरेशन झाले. ऑपरेशन ठीक पार पडले. भेटायला एक जण आला होता. त्याला घरी जायला थोरली बहीण तिच्या कारमध्ये लिफ्ट देईल असे धाकटीने व तिच्या नवऱ्याने छातीठोकपणे सांगितले. तेही प्रथेप्रमाणेच. तिऱ्हाइताला मदत करायला कोणाला सांगणे आणि ती व्यक्ती ते ऐकेल हा फाजील भरोसा - या दोन्ही प्रथाच. बहीण ही संधी सोडणे शक्यच नव्हते. तो माणूस फाटका आणि तिच्यापेक्षा उघडउघड गरीब दिसत होता. तिने अर्थातच 'मी त्या बाजूला जात नाही आहे' असे जाहीर केले. असला माणूस आपल्या कारमध्ये आपल्याबरोबर!

धाकट्या मुलीच्या मुलीने 'आई हॉस्पिटलमध्ये आहे तर मी रात्रीला तेथे राहीन' असा हट्ट धरला. पेशंट दुसऱ्या एका खोलीत होती. मध्यरात्री हॉस्पिटलचा एक तरुण नोकर हिच्या खोलीत आला. त्याचा इरादा काही चांगला नव्हता. तिने त्याला हाकलून दिले आणि हॉस्पिटलकडे दुसऱ्या दिवशी तक्रार केली. हॉस्पिटलने लगेच त्याला नोकरीवरून काढून टाकले.

यथावकाश बहिणींची आई अमेरिकेत मरण पावली. वकील मुलीला त्या निमित्ताने अमेरिकेला जायचे होते, पण तिथल्या बहिणींनी स्पष्टपणे 'तू येऊ नको' असे बजावले. त्यामुळे ती हिरमुसली. जाण्या-येण्याएवढा पैसा सहज हाताशी असताना न जाणे तिला खटकले. दुसऱ्या मुलीला आई गेल्याची बातमी कळली त्या वेळी तिच्या घरी तिच्या सासऱ्यांना भेटायला एक गृहस्थ आले होते. ही बातमी ऐकूनही काहीच आगळे न झाल्यासारखे त्या दोघांनी आपले बोलणे चालूच ठेवले. ही एकटी स्वयंपाकघरात जाऊन पाच मिनिटांसाठी शोकमग्न झाली. लगेच ठीकही झाली. नंतर तिचे वडील तेथे आले. 'वह सुपारी बहुत खाती थी' अशी त्यांची पत्नीच्या निधनावर प्रतिक्रिया होती.
यथावकाश ते त्या भाड्याच्या गॅरेजमध्ये मरण पावले. फारशी कोणाला उणीव न जाणवता जगणारी आणि मरणारी माणसे असतात, त्या प्रथेप्रमाणे त्यांचे जीवन गेले. अशी एका कुटुंबाची मजा!

- तो भारतीय डॉक्टर. इंग्लंडला नोकरीसाठी गेला. एका भारतीय मुलीशी लग्न करून इंग्लंडला स्थायिक झाला. आपण एकमेकांना अनुरूप आहोत आणि अनुरूप राहाणार आहोत असे त्यांनी सुरुवातीलाच ठरवले. त्यामुळे प्रथेप्रमाणे त्यांचा संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले. यथावकाश त्यांना दोन मुले झाली. थोरली मुलगी व धाकटा मुलगा. बायकोला चित्रकलेत रस होता व ती चांगली चित्रेही काढत असे. तिला ते औपचारिक शिक्षण घ्यायची फार इच्छा होती. पण दोन मुले वाढवणे आणि नवऱ्याची फिरतीची नोकरी यात तिचे ते स्वप्न मागे पडले.

डॉक्टर असूनही प्रथेप्रमाणे त्याचा दृष्टिकोन वैद्यकशास्त्रापुरता मर्यादित नव्हता. म्हणजे पेशंट्स, कोर्सेस आणि सेमिनार्स. किंवा इंग्लंडमधील बहुसंख्य नोकरदार/व्यावसायिक भारतीयांच्या प्रथेप्रमाणे पैसा चांगला मिळतो, त्याच्या मागे लागा, जास्त जास्त काम करा, अधिकाधिक पैसा मिळवा, महागडी गाडी घ्या, घर घ्या, सर्वमान्य भूगोल बघा असाही दृष्टिकोन नव्हता.
तो खरेतर रसिक माणूस होता. डॉक्टर ही दुय्यम ओळख होती. उदाहरणार्थ, कळपाने चाकोरीबद्ध प्रवास करणारे लंडन, पॅरिस, न्यू यॉर्क, वगैरे ठिकाणी मुख्यतः 'आम्ही तेथे जाऊन आलो' असे स्वतःला व इतरांना सांगण्यासाठी जातात. तेथील ऐतिहासिक इमारती, स्मारके, राजवाडे पाहातात आणि दमून जातात. हा डोळस प्रवासी होता. तो प्रथेप्रमाणे ही ठिकाणे जरूर बघत असे. पण त्याबरोबरच त्याला खाद्यपदार्थ, संगीत, चित्रकला, शिल्पकला यात रस होता. त्या विषयांचा त्याचा अभ्यासही होता.
जेथे जाईल तेथले विशेष खाद्यपदार्थ तो कुतूहलाने चाखून पाही. पसंत पडल्यास परत घेत असे. 'आम्ही सक्त शाकाहारी, त्यातही रोज तेहतीस वेळा वरण-भात आणि अळूची भाजी हवीच' या हट्टाने प्रवासी भारतीयांच्या परदेशी ट्रिपा 'खाण्याचे हाल झाले' अशा निष्कर्षाप्रत येतात. तसे त्याचे होत नसे.
संगीतात रस असल्याने जेथे जाईल तेथील संगीताच्या कार्यक्रमांना तो आवर्जून भेट देई. मग ते संगीत पाश्चात्त्य अभिजात संगीत असो - मोझार्ट, बाख, चायकोवस्की वगैरे किंवा वर्तमान सुगम संगीत असो. दोन्हीची त्याची जाण सखोल व अभ्यासपूर्ण असे. उदाहरणार्थ, आधुनिक पाश्चात्त्य सुगम संगीतातील जाझ, रॉक, ब्लू, हिप-हॉप, इत्यादी. संगीताची ऐतिहासिक उत्क्रांती, वाद्यांचा प्रवास, धर्माचा प्रभाव किंवा अभाव, भौगोलिक प्रसार याबाबत तो जाणकार होता.
चित्रकला, शिल्पकला यांसाठी त्या त्या ठिकाणच्या म्युझियम्सना भेट, तेथे पुरेसा वेळ घालवणे त्याला मनापासून आवडे.

खाण्याच्या बाबतीत सामान्यतः त्याला कोणताच पदार्थ वर्ज्य नसे. जो आवडेल तो पदार्थ मनसोक्त खाणे त्याला आवडे. एका लग्नसमारंभात बुफे जेवण होते. प्रमुख पदार्थांवर तर तो तुटून पडलाच पण शेवटी गोडाचे सहासात पदार्थ होते. जिलबी, गुलाबजाम, रसमलाई वगैरे. त्याने प्रत्येक मिठाईचे प्रथम सहा-सात नग घेतले म्हणजे सहा-सात जिलब्या, सहा-सात गुलाबजाम वगैरे. नंतरही तेवढेच. खाण्याबरोबरच तो मद्याचाही, विशेषतः वाइनचा दर्दी होता. देशोदेशीची विशिष्ट चवीची, वेगळ्या वर्षांची, वेगळ्या प्रकारची वाइन त्याला माहिती असे. परिणामतः वजन बरेच वाढले.

मुले मोठी व दुसऱ्या गावांना गेल्यावर त्याच्या प्रेमळ स्वभावानुसार व हौस म्हणून त्यांनी एक कुत्रा पाळला. वयोमानुसार कुत्रा म्हातारा होऊ लागला तसा त्याचा वैद्यकीय खर्च वाढत गेला. ब्रिटनमध्ये हे उपचार फार महाग असतात पण कुटुंबाचा सदस्य म्हणून त्याने ते व्यवस्थित केले. एकदा एका ओळखीच्या कुटुंबाकडे ते गेले होते. तेथे बायकोने सहज बोलता बोलता या खर्चाचा उल्लेख केला, ते त्याला आवडले नाही व त्याने तिला ते सर्वांसमक्ष सुनावले. यथावकाश पुरेसा म्हातारा झाल्यावर कुत्रा मरण पावला.

वडील त्याला फार महत्त्वाचे होते. विशेषतः आईच्या मृत्यूनंतर. ते भारतात दुसऱ्या भावाकडे राहात असत . वृद्धावस्थेत ते अगदीच विकलांग झाले. नेमकी तेव्हा त्यांची इच्छा याच्याकडे येण्याची होती. ते आजारी असल्याने तो जरा अवघड प्रकार होता. एकतर मोठा प्रवास आणि आल्यानंतर त्यांची शुश्रूषा. त्यामुळे बायको त्यांना आणायला जरा बिचकत होती. शिवाय प्रथेप्रमाणे तिची सासऱ्यांशी याच्याइतकी जवळीकही नव्हती. पण याने त्यांना तशा परिस्थितीत इंग्लंडला काही महिन्यांसाठी आणलेच. एकदा या मंडळींना एका मित्राने जेवायला व राहायला दुसऱ्या ठिकाणी बोलावले होते. तेथे हे नवरा-बायको आणि म्हातारे वडील हजर झाले. वडिलांना आधाराशिवाय उभेही राहाता येत नसे. याच्या घरापासून त्यांच्या घरापर्यंत प्रवास मोठा होता. चार-पाच तासांचा. याने आपल्या गाडीत खास सोय करून त्यांना झोपवून आणले. घरात गादीवरून नेले आणि तेथे कॉटवर झोपवले. दर तासाने तो किंवा बायको ते ठीक आहेत ना पाहात असत. त्याची बायको त्यांना 'कासव' म्हणे. कारण कोणी खोलीत आले तर ते पांघरूण बाजूला करून डोके वर करून पाहात. हा तिचा आणि मुलांचा खासगी विनोद होता.

या भेटीत दुसऱ्या दिवशी एका दक्षिण भारतीय रेस्टॉरंटला जाण्याचा प्रस्ताव होता. याने वडिलांना घेऊन जायला नको म्हणून स्पष्ट नकार दिला आणि इथून आपण सरळ परत आपल्या घरी जायचे असे ठामपणे म्हटले. बायकोची इच्छा त्या रेस्टॉरंटला सर्वांबरोबर जाण्याची होती. त्याने नकार दिला, ती हिरमुसली पण ते कुटुंब त्यांच्या घरी रवाना झाले.

त्याची एकूण जीवनशैली पाहाता अल्पावधीतच प्रथेप्रमाणे त्याला बरेच विकार सुरू झाले. प्रथम ऐकण्याचे मान कमी झाले. प्रथेप्रमाणे होत नाहीच तसा श्रवणयंत्रांचा उपयोग होईना. त्यामुळे बाहेर किंवा घरी लोकांना भेटणे, फोनवर बोलणे कठीण होऊ लागले. चालताचालता अचानक तोल जाऊ लागला, एकदा तो घराबाहेर जवळ चालत गेला आणि एकामागून एकदा चार पावलांत तीन वेळा पडला. त्याला आपलेआपण उठताही येईना. कोणीतरी उठवून कारमधून त्याला घरी आणला. मग हॉस्पिटल, तिथे सहा-सात तास वाट बघून मग तपासण्या वगैरे शुक्लकाष्ठ. मग त्याने एकटे बाहेर जाणेच थांबवले. तसेच ड्रायव्हिंगही बंद झाले. अवयवांमध्ये अस्थिरता व जरासा कंप आला. कंबरदुखी सुरू झाली. त्यामुळे फार काळ कॉटवर बसून कॉम्प्युटरवरही काम करता येत नसे.

झोपेचा प्रॉब्लेम सुरू झाला. पहिले म्हणजे, अंथरुणावर पडल्यापडल्या डोक्यात भारतीय शास्त्रीय संगीत सुरू होई. ते अगदी कमी आवाजात असे पण सतत चालू राही. त्याला सुरावट स्वच्छ ऐकू येई. वरखाली होणारे सूर, दीर्घ ताना... एका परीने त्याला हे बरेच वाटे. इलेक्ट्रॉनिक

संगीत लावा, आवाज लहान-मोठा करा, झोपण्याआधी बंद करा वगैरे श्रम वाचले. हे आपले अगदी खासगी शरीरातील संगीत. जरी ते त्याचे ते चालू राही, हवे तेव्हा थांबवता येत नसे.

मग उत्तररात्री किंवा भल्या पहाटे तीन-चार-पाच वाजता झोप लागत असे, तीही अस्वस्थ. आठवणीतली मराठी, हिन्दी गाणी, कविता, श्लोक म्हणण्याचा तो प्रयत्न करे. 'या निशा सर्वभूतानाम् तस्याम्... ' किंवा 'दुरितांचे तिमिर जावो...' किंवा 'वादा तेरा वादा...' अशा कोणत्याच पठणाने झोप येत नसे. त्याने नियमित श्वसनाचे काही प्रयोगही करून पाहिले. [१ ते ४ मोजत श्वास आत घ्या. १ ते ७ मोजत श्वास रोधून धरा, १ ते ८ मोजत श्वास बाहेर सोडा. असे प्रयोग.] त्यांचाही उपयोग होईना. झोपेचे तंत्र असल्यास त्याला ते कळले नाही. तिला वाटेल तेव्हाच ती येत असे. अनेकदा पहिल्या स्वप्नातून जागे झाल्यावर आपण झोपलो होतो तर! असे जाणवे. बऱ्याच वेळा धड जागा नाही आणि धड झोपलेलाही नाही अशी अवस्था येत असे. त्या अवस्थेत स्वप्न आणि जागृती या सीमेवर मन फिरत असे.

रात्री दिवा बंद केल्यानंतर तीन-चार तास शरीर अनेक नवीन कुरापती चालू ठेवे. उचकी, ढेकर, घशाशी येणे, पोटात फिरणारे गॅसेस, जळजळ, त्यामुळे वारंवार उठून बसणे, शिंका, ठसका, अचानक खोकला, पाय गुडघ्याखाली उडणे, शरीराला कोठेतरी टाचणी टोचल्यासारखे वाटणे व आग होणे, एका कुशीवर झोपायचा प्रयत्न केल्यास एक नाकपुडी बंद होणे मग कूस बदलणे, भ्रम आणि संभ्रम, थंडी वाजते आहे असे वाटून जास्तीचे पांघरूण घेतले की लगेच गरम होते आहे असे वाटून ते दूर करणे, इत्यादी. शिवाय झोप लागते आहे तोच छातीतून किंवा घशातून चमत्कारिक मोठे आवाज येणे सुरू झाले, अनेकदा बाहेरून मोठे स्फोटाचे, प्राणी हंबरल्याचे, ऐरणीवर हातोडा मारल्याचे, कोणीतरी दार ठोठावल्याचे वगैरे काल्पनिक आवाज असत. मग झोप उडे ती काही तासांसाठी. या विकाराला exploding head syndrome म्हणतात. त्यावर औषध नसते. स्वतः डॉक्टर असल्याने तो बाकी विकारांवर काहीबाही तात्पुरते उपाय करून बघे. पण सगळ्याच औषधांनी होते तशी प्रथेप्रमाणे झाली तर थोडी सुधारणा आणि अनिष्ट परिणाम मात्र नक्की होत. उदाहरणार्थ, मल-मूत्रविसर्जन कायमचे बिघडले. मुळात शरीर द्रोह करत होते आणि त्यावर उपाय नव्हता.

उशीरा झोपण्यामुळे 'आज' आणि 'उद्या' या शब्दांना अर्थ राहिला नाही. 'उद्या हे करू' अशा प्रथेप्रमाणे केलेल्या निर्धाराचा काही तासांत धुव्वा उडे. त्यामुळे 'उद्या ही कामे' असा निश्चय करण्याचा पोरकटपणा बंद पडला. रात्रीच्या विविध रूपांची जाणीव होऊ लागली आणि आजवरच्या ज्ञानाने तिचा खुलासा होईना. डोळे मिटा आणि उघडा इतकी रात्र साधी राहिली नाही. रात्र अज्ञेय राहात असे. झोपायच्या सुमाराला वरून खटकन एक गिलोटिन खाली येई. त्याच्या एका बाजूला हा व दुसऱ्या बाजूला झोप असे. कधी ते गिलोटिन गारगोटीसारखे टणक असे, कधी रेशमासारखे तलम, कधी चिखलासारखे मऊ, कधी अभ्रकासारखे पारदर्शक, कधी लोखंडी घन भिंत, कधी दलदल. तिचे रोजचे अतर्क्य स्वरूप मन अस्थिर करे. त्यामुळेही मानसिक असंतुलन वाढले. आपण काही करू शकतो हा आत्मविश्वासच गेला. उभ्याने एखादा रद्दी कागद टोपलीत टाकायचा तर बहुधा नेम चुकत असे. क्वचितच कागद टोपलीत पडे. भरलेला ग्लास सहज हातातून गळून पडे, जिन्यावरून जाताना एक पाऊल पायरीवर ठेचकाळे व परत तोल जाई. प्रथेप्रमाणे कार्यकारणभावावर आधारित विचारप्रक्रिया आजवर होती. तिने कामही चालत असे. हे केले म्हणून ते झाले इतक्या सुलभतेने शारीरिक आणि मानसिक व्यवहार आता समजेनात.

त्यात भर म्हणून विस्मरण होऊ लागले. दहा वर्षांपूर्वीची घटना तंतोतंत आठवे पण दहा मिनिटांपूर्वी पेन कोठे ठेवले, फोन कोठे ठेवला, चष्मा कोठे ठेवला हे आठवत नसे.

स्वप्ने तर चमत्कारिक आणि अविरत असत.

बाजूच्या खिडकीचे पडदे कूस बदलण्याआधी नक्की

बाजूला सारलेले असत. पण परत कूस बदलली आणि पाहिले तर ते बंद म्हणजे, एकमेकाजवळ ओढलेले असत. फक्त पदडेच नाही तर त्यांच्या मागच्या खिडकीची दारेही बंद असत. हे कोणी केले? मग त्याच्या लक्षात येई की खिडकीही निराळी आहे. नेहमीची लाकडी चौकट नाही, नेहमीची बाहेर उघडता येणारी दारे नाहीत. स्टीलची चौकट आहे आणि सरकवायची दारे आहेत. तेव्हा हे स्वप्न आहे असे लक्षात येई. त्याबरोबर खालच्या रस्त्यावरून लोकांची झुंड ऐकू येई. ते काहीतरी घोषणा देत असत.

कधी तो उताणा पडलेला आहे आणि वरून एक काचेचा पाण्याचा प्रचंड टँक त्याच्यावर हळूहळू उतरत आहे. त्यात गर्द हिरव्या दाट गवताचे बेट आहे आणि त्या गवताची पाती संथ लयीत डोलत आहेत,

करड्या रंगाच्या भिंतीवर विचित्र आकाराच्या काळ्या सावल्या आहेत - कधी त्या हिंस्र प्राण्यांच्या वाटाव्यात पण ओळखू येऊ नयेत. अंधाऱ्या अनोळखी गल्ल्याबोळांतून तो चालतो आहे, हे तर बऱ्याच वेळा पडणारे स्वप्न. स्वप्नातील अज्ञात प्रदेशातील सततच्या प्रवासाने अतोनात खरा थकवा येई. मग पुढचा दिवस हमखास उशिरा म्हणजे दुपारी बारा-एक वाजताही शिळा आणि अप्रसन्न सुरू होत असे.

महत्त्वाचा होता तो हृदयविकार. हृदय इतके दुबळे झाले होते की दुसरे हृदय बसवणे एवढाच पर्याय राहिला. वर्तमान ब्रिटनमध्ये ते सहजशक्य नसते. स्वस्तातल्या उपचारासाठी काही वर्षे थांबावे लागले. प्रतीक्षा यादीच लांब असते. त्यादरम्यान याला योग्य असे हृदय ब्रिटिश आरोग्यसेवा शोधे. त्या ऑपरेशनसाठी हॉस्पिटलमध्ये जागा आणि दुसरे हृदय मिळेपर्यंत दोन-तीन वर्षे गेली पण एकदाचे ऑपरेशन झाले. त्याच्या खाण्यापिण्यावर, फिरण्यावर बरीच बंधने आली. इतरही छोटेमोठे व नवे विकार सतत चालू राहिले. विशेष म्हणजे तो या दरम्यान खचला नाही. त्याचा दृष्टिकोन कायम हसतमुख आणि सकारात्मक राहिला.

सामान्यतः ब्रिटनमध्ये माणूस पन्नास वर्षांचा झाला की वाढदिवसाचा सोहळा करतात. आपल्याकडे जशी साठी साजरी केली जाते, तसा. पण याची तब्येत लक्षात घेऊन घरचे ऑपरेशननंतर त्याचा तो उभा राहू शकला तोपर्यन्त थांबले. मग एक सार्वजनिक कार्यक्रम करण्याचे ठरवले. तो त्याचा सत्तावन्नावा वाढदिवस होता. वर्तमान प्रथेप्रमाणे त्याला समारंभ आयोजित केला आहे असे घरच्यांनी आधी सांगितले नाही.अचानक त्याला त्याच्या आवडत्या कार्यालयात आणले. तेथे पन्नास-साठ आमंत्रित हजर असल्याचे पाहून तो हर्षचकित झाला.

हृदयबदलानंतर साधारण चार-पाच वर्षांनी माणसाचे आयुष्य वाढते, असा वैद्यकीय अंदाज असतो. नोंदण्याची गोष्ट म्हणजे, हा अंदाज अपवादात्मकरीत्या याच्याबाबत खरा ठरलाही. शेवटच्या एक-दोन वर्षात तो व्हीलचेअरवरच होता. त्याची लग्न झालेली मुलगी दूरच्या गावाला राहात असे. तिच्या गावाला जाऊन राहावे अशी त्याची अखेरची इच्छा होती. नशिबाने त्याच गावी त्याला एक नोकरीही मिळाली आणि नवरा-बायको तेथे रवाना झाले. यथावकाश त्याचा तेथेच मृत्यू झाला.

दरम्यान मुलगा जपानला स्थायिक झाला. मुलीने आपल्याला मूल नको असे लग्न झाल्यावरच ठरवले होते. त्यामुळे बायकोवर ती संभाव्य जबाबदारी नव्हती. आता बायकोने एकटीने इंग्लंडला राहाण्याचे ठरवले. तिने चित्रकला पुन्हा सुरू केली. हळूहळू चित्रे विकलीही जाऊ लागली.

-त्या दोघी बहिणी. गरीब शहरी घरातल्या. लहानपणच्या कुपोषणाने बऱ्याच भारतीय स्त्रिया असतात तशा अशक्त आणि हडकुळ्या होत्या. दिसायला सामधाम. वडील लवकर गेले. त्या वयात आल्यावर मामानेच त्यांची लग्ने जुळवली. थोरलीचे लग्न समाधानकारक झाले. प्रथेनुसार ती 'लेक सुखी आहे सांगा' असे गुणगुणू लागली.

दुसऱ्या मुलीचे लग्न नीट जमले नाही. मामाने प्रथेनुसार एक नोकरी असणारा मुलगा निवडला. त्याची पार्श्वभूमी फारशी बघितली नसावी. जवळच्या एका गावातील एका

कारखान्यातून निवृत्त झालेल्या कामगाराचा तो मुलगा. कामगाराच्या कुटुंबाचे नाव चांगले होते, एवढाच काय तो आश्वासक घटक. पण या मुलाने अल्पावधीत बऱ्याच नोकऱ्या बदलल्या होत्या, महत्त्वाचे म्हणजे, त्याला दारूचे व्यसन होते. प्रथेनुसार ही सावध करणारी गोष्ट पण मामाच्या कानावर तरी ते आले नसावे किंवा लग्न झाले की तो स्थिर होईल अशी त्या मुलाच्या आई-वडिलांप्रमाणे त्याची अपेक्षा असावी.

लग्नाआधी हा मुलगा शहरातील थोरल्या बहिणीच्या नात्यातील एका घरी राहात असे. तेथून तो दिवस-दिवस गायब होई. असाच एकदा तो दोन-चार दिवस घरी फिरकला नाही, मग त्या लोकांनी त्याच्या बहिणीला कळवले. ती आणि तिचा नवरा शहरात याच्या शोधासाठी फिरले. जाणाऱ्याला एकच दिशा असते, शोधणाऱ्याला अनंत या न्यायाने त्यांचा शोध अयशस्वी झाला मग त्यांनी त्याच्या वडिलांच्या कानावर हा सापडत नसल्याचे घातले. तो म्हातारा शहरात आला आणि त्याने प्रथम एक पुतण्या गाठला. हा पुतण्या आणि तो मुलगा एकाच वयाचे आणि जवळचे होते. त्याच्या मदतीने त्यांनी याचा तलास लावला आणि त्याला झापला. 'तू एखाद्या रांडेकडे पडला आहेस का हे आम्हांला शोधायला लावू नको' असे त्याला ऐकवले. असे प्रसंग वारंवार येत असत. आपल्यामुळे दुसऱ्याला त्रास होऊ नये हे मूल्य त्या मुलाच्या विचारसरणीत नव्हते. त्याच्या एका आतेभावाने ओळखीने त्याला दोन-तीन ठिकाणी नोकऱ्याही मिळवून दिल्या. तो कोठेच टिकला नाही. दारूने त्याला स्वतःचाच भरोसा नसे की उद्या तो ठरावीक वेळी कामावर हजर होईल. दुसऱ्याने आपल्यासाठी शब्द टाकला तर त्याला अवघड परिस्थितीत टाकू नये, ही आपली जबाबदारी आहे, हे मूल्यही त्याच्या जाणिवेत नव्हते.

दरम्यान लग्न झाले, यथावकाश प्रथेप्रमाणे एक मूलही झाले. दारू काही सुटली नाही, वाढतच गेली. एकदा तो आणि त्याचा जवळचा चुलतभाऊ [तोच जो त्याच्या शोधासाठी सक्रिय होता] सुट्टीसाठी म्हणून एका ठिकाणी गेले होते. रात्री प्रथेप्रमाणे अतोनात मद्यपान झाले. इतके, की दुसऱ्या दिवशी पहाटे जाग आली तेव्हाही त्या आठवणीने भावाला ओ येत होती. हा खोलीत दिसला नाही म्हणून तो बाहेर गेला. गेस्ट हाऊसच्या रखवालदाराबरोबर हा पहाटे पहाटेच दारू पीत बसला होता.

यथावकाश पोट बेसुमार सुटणे, परत नोकरी जाणे या गोष्टी सुरू झाल्या. घर चालवण्यासाठी बायकोने जवळच्या एका गॅस एजन्सीत नोकरी शोधली व ती प्रामाणिकपणे तेथे काम करू लागली. याच्या तब्येतीची काळजी वाटून तो चुलतभाऊ एक दिवस ओळखीच्या एका पॅथॉलॉजिस्टला घेऊन त्याच्या घरी आला. याने कोणतेही सॅम्पल तपासणीसाठी देण्यास नकार दिला. भाऊ आणि डॉक्टर हात हलवत परत आले.

यथावकाश त्याला असह्य वेदना होऊ लागल्या आणि जवळच्या शहरात स्वस्तातल्या हॉस्पिटलमध्ये दाखल करायची वेळ आली. बायको, मेव्हणी, तिचा नवरा, थोरली बहीण आणि तिचा नवरा यांची धावपळ सुरू झाली. त्याच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या होत्या. सुधारण्याची काहीच शक्यता नव्हती.

जसा असेल तसा त्याला गावाला घरी पाठवा असा निरोप वडिलांनी दिला. त्याकडे इतरांनी दुर्लक्ष केले. त्याला हॉस्पिटलमध्येच ठेवला.

त्याच्या एक भावाने एका स्वयंसेवी संघटनेतर्फे स्वस्तात किडनी बसवून मिळते असा शोध एका संध्याकाळी उशिरा लावला. त्याला दुसऱ्या दिवशी पहाटे दुसऱ्या गावाला जायचे होते म्हणून त्याने त्यांच्या दुसऱ्या एका भावाला तो फोन नंबर दिला. त्या भावाने या माहितीवर काहीही केले नाही. यथावकाश हा हॉस्पिटलमध्येच मरण पावला.

**– पुरन्दरे चन्द्रशेखर**
purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk